


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १९८ वा मंगळवार दि २३ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# फडणवीसांचा पवारांना दे धक्का, बड्या नेत्याचा मुलगा भाजपात प्रवेश करण्याची चर्चा, पुण्यात फाईव्ह स्टार हॉटेलात बैठक

वृत्तसंस्था/ पुणे

राज्यात येत्या काही महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांपूर्वी अनेक राजकीय पक्षांमध्ये इन्कमिंग आणि आऊटगोइंग सुरु झाले आहे. पुण्यात सुद्धा भाजप शरद पवारांच्या राष्ट्रवादीला एक मोठा धक्का देण्याच्या तयारीत आहे. महापालिका निवडणुकीपूर्वी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदाराचा मुलगा हा भाजपच्या वाटेवर असल्याच्या चर्चा पुण्याच्या राजकीय वर्तुळात रंगत आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या पुण्यातील वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात असणाऱ्या आमदार बापूसाहेब पठारे यांचे पुत्र सुरेंद्र पठारे हे भाजपच्या संपर्कात असून ते लवकरच भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. यासंदर्भात सुरेंद्र पठारे यांची भाजपच्या पुण्यातील बड्या नेत्यांसोबत विमान नगर परिसरातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये बैठक पार पडल्याचे सुद्धा माहिती आहे. या बैठकीनंतर पुण्याचे भाजपचे बडे पदाधिकारी हे आपल्या इच्छुकांना सुरेंद्र पठारे हे तुमचे पॅनल प्रमुख असतील त्यामुळे त्यांच्या भेटी घ्या असं खासगीत सांगत असल्याची माहिती आहे. प्रभाग क्रमांक २,३,४ मध्ये जर त्यांच्या जवळच्या पदाधिकाऱ्यांना भाजपने उमेदवारी दिली तरच पठारे प्रवेश करणार सांगितलं जात आहे. मात्र पठारे यांनी भाजपच्या शहरातील काही कारभारी असणाऱ्या नेत्यांची नुकतीच भेट घेतल्यामुळे या चर्चा अधिकचं चवीने चर्चिल्या जात आहेत. यासंदर्भात सुरेंद्र पठारे यांनी प्रतिक्रिया सुद्धा दिली आहे. मी भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार यासंदर्भातल्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहेत. याआधी मी १ तारखेला भाजपमध्ये प्रवेश करणार अशा चर्चा काही लोक करत होते. त्यानंतर ४ तारखेला माझा प्रवेश होईल अशाही चर्चा केल्या हे दोन मुहूर्त हलक्यानंतर आता २२ तारखेला माझा प्रवेश होणार होता असं सुद्धा बोलले गेले. मात्र प्रवेश करायचा असेल तर मला घेऊनच होईल ना? पण मलाच माझ्या प्रवेशाची कल्पना नाही या केवळ वावड्या आहेत. असं सुरेंद्र पठारे यांनी महाराष्ट्र टाइम्स ऑनलाइनशी बोलताना स्पष्ट केले आहे. त्यामुळे एकीकडे आमदार पुत्राच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा सुरू असताना पठारे यांनी मात्र या सर्व चर्चा फेटाळल्या आहेत. दरम्यान, विधानसभा निवडणुकीपूर्वी आमदार बापूसाहेब पठारे यांनी भारतीय जनता पक्षाची साथ सोडून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये



प्रवेश केला होता. राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर त्यांनी वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातून तिकीट मिळून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे तत्कालीन आमदार सुनील टिंगरे यांच्या विरोधात निवडणूक सुद्धा लढवली. या निवडणुकीमध्ये पठारे यांनी सुनील टिंगरे यांचा पराभव केला होता. त्यामुळे पुणे शहरात राष्ट्रवादी काँग्रेस ( शरदचंद्र पवार ) पक्षाचे ते एकमेव आमदार आहेत. एकीकडे शहरात शरद पवार यांचा राष्ट्रवादीचे एकमेव आमदार असणारे बापूसाहेब पठारे यांची भाजपशी जवळीक आहेच तर दुसरीकडे पठारे हे वेळोवेळी अजित पवारांच्या मंचावर सुद्धा दिसून येतात. त्यामुळे महायुतीमध्ये सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध असणाऱ्या पठारे कुटुंबातील सदस्यांनी जर भाजप मध्ये प्रवेश केला तर नवल वाटणार नाही हे मात्र नक्की.

# अन्यथा विचार करावा लागेल! शिंदे आपल्या मंत्र्यांवर संतापले; निर्मल भवनवर कानउघाडणी

वृत्तसंस्था/मुंबई

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पाठोपाठ एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पक्षाच्या मंत्र्यांची कानउघाडणी केली आहे. अकार्यक्षम मंत्र्यांना एकनाथ शिंदे यांना सुनावल्याची माहिती आहे. मंत्र्यांच्या कार्यपद्धतीवर शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. पक्ष संघटनेसाठी वेळ न देणाऱ्या मंत्र्यांना एकनाथ शिंदे झापलं. महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यापासून एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे मंत्री सर्वाधिक वादग्रस्त राहिले आहेत. त्याचा फटका शिंदेसेनेला येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिंदे स्वपक्षीय मंत्र्यांना निर्वाणीचा इशारा दिला आहे. काही दिवसांपूर्वी महायुती सरकारची कॅबिनेट बैठक झाली. या बैठकीनंतर उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पक्षाच्या मंत्र्यांची निर्मल भवनमध्ये गुप्त बैठक घेतली. या बैठकीत शिंदे यांनी त्यांच्या पक्षाच्या मंत्र्यांना कडक शब्दांत सुनावलं. प्रशासकीय कामाची पद्धत आणि पक्ष संघटनेकडे होणारं दुर्लक्ष यावरुन शिंदे यांनी नाराजी बोलून दाखवली. यावेळी शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांची चांगलीच कानउघाडणी केली. एबीपी माझानं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. एकनाथ शिंदे यांनी अकार्यक्षम मंत्र्यांना सुनावलं. त्यांच्या कार्य पद्धतीवर नाराजी व्यक्त केली. मंत्र्यांची प्रशासकीय कामाची पद्धत, पक्ष संघटनेकडे त्यांचं होणारं दुर्लक्ष याबद्दल शिंदे यांनी मंत्र्यांना सुनावलं. शिंदे यांनी मंत्र्यांना जनता दरबार घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. पण त्याकडे अनेकांनी दुर्लक्ष केलं. त्याबद्दल शिंदे यांनी नाराजी बोलून दाखवली. अनेक मंत्री पक्ष संघटनेसाठी काम करत नसल्याच्या तक्रारी शिंदे यांच्याकडे येत आहेत. त्यामुळे शिंदे यांनी संताप व्यक्त केला. सोमवार ते बुधवार कॅबिनेटच्या बैठका आणि त्यानंतर मतदारसंघ अशी शिवसेनेच्या बऱ्याच मंत्र्यांच्या कामाची पद्धत आहे. या कार्यपद्धतीवर शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. जनतेचे प्रश्न सोडवा, अन्यथा विचार करावा लागेल, असा गर्भित इशारा शिंदे यांनी मंत्र्यांना दिला. त्यामुळे शिंदेसेनेत खळबळ उडाली आहे. मंत्रिपदावरुन उचलबांगडी होण्याची भीती अनेकांना वाटू लागली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गेल्याच आठवड्यात त्यांच्या पक्षाच्या मंत्र्यांना कार्यक्षमता वाढवण्याच्या सूचना दिल्या होत्या. पालकमंत्री असूनही त्या जिल्ह्यांमध्ये न फिरकणाऱ्या अजित पवार संतापले होते. जिल्ह्यात केवळ तोंड दाखवण्यासाठी येऊ नका. अन्यथा खुर्च्या रिकाम्या करण्याची तयारी ठेवा, असा निर्वाणीचा इशारा अजित पवार यांनी त्यांच्या मंत्र्यांना दिला होता.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कर्जात महाराष्ट्र माझा...

## संपादकीय लेख



एकीकडे केंद्र सरकारचे वस्तू व सेवाकराच्या (जीएसटी) संकलनाचे आकडे कोटीच्या कोटी उड्डाणे घेत असताना, दुसरीकडे राज्यांची आर्थिक स्थिती चिंताजनक होत असल्याचे वास्तव नियंत्रक व महालेखापालांच्या (कॅग) ताज्या अहवालातून समोर आले आहे. पगार, निवृत्तीवेतन आणि कर्जांवरील व्याजाचे ओझे राज्यांना दिवसेंदिवस पेलवेनासे होत आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये राज्यांचे एकत्रित कर्ज १७ लाख कोटी रुपयांवरून तिपटीहून अधिक वाढून सुमारे साठ लाख कोटी रुपयांवर पोहोचल्याचा अहवाल राज्यांच्या वित्त सचिवांच्या परिषदेत सादर झाला आहे. या राज्यांच्या महसुली खर्चातील सर्वाधिक भाग हा पगार, निवृत्तीवेतन, अनुदाने आणि घेतलेल्या कर्जांच्या परतफेडीवरच खर्च होत आहे; तर दुसरीकडे महसुलात वाढ होत असली, तरी ती अपेक्षेप्रमाणे नसल्याचे आढळून येणे, असा दुहेरी पेच उभा राहू शकतो. पूर्वी आजारी राज्य म्हणून ख्याती असलेल्या उत्तर प्रदेशाने महसूलविषयक कामगिरीत आश्चर्यकारक कामगिरी बजावत पहिला क्रमांक मिळवला आहे; तर महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यांना समाधानकारक कामगिरी करूनही गेल्या दहा वर्षांत तुटीचा सामना करावा लागला आहे. देशात सर्वाधिक कर्ज काढणाऱ्या राज्यांमध्ये पंजाब आघाडीवर असून, त्यापाठोपाठ नागालँड आणि पश्चिम बंगाल आहे. तुलनेत महाराष्ट्र, गुजरात आणि ओडिशा ही राज्ये सर्वांत कमी कर्ज काढणाऱ्यांच्या यादीत आहेत. महाराष्ट्राची कामगिरी इतर राज्यांच्या तुलनेत समाधानकारक असल्याचे दिसते. फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी अँड बजेट मॅनेजमेंटच्या निकषांनुसार महसुली तूट मर्यादेत राखण्यात राज्याने यश मिळवले आहे; तसेच कर्जांचे प्रमाणही (१४ टक्के) इतरांच्या तुलनेत नियंत्रणात आहे; परंतु रकमांच्या चष्म्यातून पाहता गेल्या दहा वर्षांत हे कर्ज साडेतीन पटींनी वाढले आहे. त्यामुळे त्याची परतफेड हा महसुली खर्चातील सर्वांत मोठा घटक ठरला आहे. दुसरीकडे महसुलाचे स्रोत वाढविण्यातही महाराष्ट्रासह हरियाणा, गुजरात, कर्नाटक, तमिळनाडू आणि गोव्याची कामगिरी इतरांच्या तुलनेत उठून दिसणारी आहे. त्यासाठी पेट्रोल व डिझेल यांच्यावरील मूल्यवर्धित कर (व्हॅट), मुद्रांक शुल्क आदी स्रोतांनी राज्य सरकारला हात दिल्याचे दिसते. महसुली तूटही मर्यादेत आणि इतरांच्या तुलनेत कमी असली, तरी वाढती एकूण वित्तीय तूट हा काळजीचा विषय आहे. ही कर्जे आणि महसुली खर्चातील सर्वांत मोठा वाटा हा वेतन, निवृत्तीवेतन आणि कर्जफेड, अशा अनिवार्य बाबींवर खर्च होणे, हा महाराष्ट्राप्रमाणेच अनेक राज्यांसाठी चिंतेचा मुद्दा ठरला आहे. बदलत्या काळात कर्जे काढणे अपरिहार्य असले, तरी त्याचा वापर भांडवली कामे, म्हणजे संपत्ती निर्माणासाठी झालेला नाही. महाराष्ट्रासारख्या अनेक राज्यांनी लाडकी बहीणसारख्या थेट लाभाच्या योजनांवर प्रचंड खर्च केल्याने अर्थसंकल्पावर भार आला आहे; त्याप्रमाणेच पुरवणी मागण्यांसारख्या अर्थसंकल्पबाह्य, अनियोजित खर्चांचाही या बेशिस्तीमध्ये मोठा वाटा आहे. करोनाकाळात विस्कटलेल्या अर्थचक्रामुळे करसंकलनात झालेली घट आणि कल्याणकारी योजनांवरील वाढलेल्या खर्चाचाही त्यात मोठा वाटा राहिला. कॅगचा हा अहवाल राज्य सरकारांची आर्थिक बेशिस्त आणि तिजोरीकडे लक्ष न देता सुरू ठेवलेल्या लोकानुनयावर बोट ठेवतोच; मात्र वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले, तर जीएसटी सारख्या केंद्रीकरणाच्या दिशेने जाणाऱ्या अर्थरचनेचे हे परिणाम आहेत. एकीकडे केंद्र सरकारला जीएसटीमधून विक्रमी उत्पन्न मिळाले, मात्र राज्यांचे उत्पन्न आणि उत्पन्नाचे स्रोतही आक्रसताना दिसत आहेत. या रचनेत केंद्र सरकार सर्वशक्तिशाली बनले असून जीएसटीचा वाटा किंवा मोठ्या खर्चांच्या योजनांसाठी राज्यांना केंद्राच्या मेहेरबानीवर अवलंबून राहवे लागत आहे. त्यातच गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने चतुराईने उपकर (सेस) किंवा अधिभाराच्या (सरचार्ज) रूपाने केलेल्या करवाढीतील हिश्शातूनही राज्यांच्या हाती भोपळाच येत आहे. भविष्यात पेट्रोल-डिझेल जीएसटी च्या कक्षेत आले, तर राज्यांना कर्मचाऱ्यांच्या पगारासाठीही केंद्राचे तोंड पाहण्याची वेळ येईल. सशक्त संघराज्य रचनेच्या दृष्टीने हे चांगले लक्षण नव्हे. जीएसटीची भरपाई विषम पद्धतीने होत असल्याची विशेषत: विरोधी पक्षांच्या राज्य सरकारांची तक्रार असून हे वितरण अधिकाधिक पारदर्शक व समन्यायी पद्धतीने कसे होईल, यावर भर देण्याची गरज आहे. राज्यांनी केंद्रावरील अवलंबित्व कमी करून उत्पन्नाचे नवनवे कल्पक स्रोत शोधणे आणि लोकप्रिय घोषणांना आवर घालून अनावश्यक अनुदाने-खर्चांना कात्री लावण्याची गरज या अहवालाने अधोरेखित केली आहे.

## मर्दडी देवी मंदिरात नवरात्रोत्सवाला प्रारंभ; भक्तांचा उत्साह शिगेला!

**जनसंचलन/धाड**



निसर्गाच्या सान्निध्यात वसलेल्या श्रीक्षेत्र मर्दडी देवी मंदिरात नवरात्रोत्सवाची सुरुवात सोमवारी मोठ्या उत्साहात झाली. बुलढाणा तालुक्यातील धाड परिसरात वसलेले हे मंदिर दरवर्षी नवरात्रोत्सवासाठी भक्तांचे आकर्षण ठरते. अजिंठा पर्वत रांगेत वसलेल्या या मंदिराची पारंपरिक पूजा परंपरा पुरातन काळापासून अविरत सुरू आहे. मर्दडी देवी भक्तांच्या नवसाला पूर्ण करणारी, ज्वालायुक्त दैवत म्हणून ओळखली जाते. धाडपासून सुमारे ८ किलोमीटर अंतरावर गर्द डोंगराळ झाडीमध्ये हे मंदिर वसले आहे. डोंगराच्या माथ्यावरून थोडे पश्चिमेस उतरल्यानंतर मर्दडी देवीचे मंदिर दिसते. परिसरात मोठ्या वटवृक्षांसह इतर झाडेही आहेत, तर मंदिराच्या मागे पाण्याचे गोमुख तीर्थ आहे, जेथे भक्त देवीच्या दर्शनासाठी येतात. मंदिराची रचना सभामंडप, महादेवाचे मंदिर आणि तेलाई देवीच्या मर्दडी मातेची मनोहारी मूर्ती मंदिरासह झाली आहे. येथे मर्दडी देवीची मूर्ती आणि परशुरामाची मूर्ती स्थापित आहेत. प्रत्येक दिवशी विधिवत पूजा, आरती आणि नैवेद्य केले जाते. दैनंदिन पूजाविधी स्थानिक गुरव पुजारी कुटुंब पार पाडत आहे. मंदिर संस्थानाच्या वतीने नवरात्रोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणावर भक्तांची गर्दी होईल, यासाठी नियोजन केले आहे. मर्दडी देवी मंदिर संस्थानने विविध सुविधा उभारल्या आहेत. मंदिराचे विश्वस्त दीपक वारे, तोताराम रिंढे, डॉ. सुनील जोशी, गणेश वाघ, ज्योती ताठे, डॉ. रमेश सोनूने, माधव धंदर, प्रताप पडोळ आणि पुजारी कुटुंब या उत्सवाच्या आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शाहरुखचा मंत्र पाळला आणि नागपूरची ही कन्या मुंबईच्या मायानगरीत चमकली...

ज्येष्ठ अभिनेत्री रीमा लागू यांच्यासोबत आपल्यासारख्या नवख्या अभिनेत्रीला उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून नामांकन मिळालंय, ही गोष्ट श्वेतासाठी एखादा पुरस्कार मिळण्यापेक्षाही लाखमोलाची होती. त्या बातमीचं कात्रण तिनं जपून ठेवलं. मोठ्या आनंदानं ती त्या पुरस्कार वितरण सोहळ्याला गेली. ज्यांना नामांकनं मिळाली, त्यांची बसायची वेगळी व्यवस्था होती. त्यामुळे श्वेता भारावली होती. ज्या कलाकारांना आपण मालिका, सिनेमांमध्ये बघतो, त्यांच्या रांगेत ती बसली होती. पुरस्कार मिळो न मिळो, किमान इथवर आपण पोहोचलोय, ही भावनाच खूप सुखावणारी ठरली. ...आणि पुरस्काराच्या मानकरी आहेत... या घोषणेपेक्षा या पुरस्कारासाठी नामांकनं आहेत... या वाक्यात आपलंही नाव समाविष्ट आहे, हीच तिच्यासाठी मोठी मिळकत होती. तेव्हा तर पुरस्कार मिळाला नाही. मात्र, नंतर श्वेतानं स्वत:ला असं काही सिद्ध केलं की नागपूरची ही कन्या मुंबईच्या मायानगरीत चांगलीच चमकली.



श्वेता पेंडसे. पूर्वाश्रमीची श्वेता पुराणिक. नाटक, मालिका आणि चित्रपटक्षेत्रात तिनं जे केलं ते अव्वल दर्जाचंच. अ परफेक्ट मर्डर, ३८ कृष्णविला या तिच्या नाटकांनी कमाल केलीय. मालिकांतून ती घरोघरी पोहोचली. त्यात अस्सं सासर सुरेख बाईमधील तिनं साकारलेली विभा ही भूमिका रसिकांच्या मनात घर करून गेली. तिनं लिहिलेला राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त बार्डो या चित्रपटानं तिला वेगळीच ओळख मिळवून दिली. जेही करायचं ते उत्कृष्ट, असं तत्त्व पाळणाऱ्या श्वेताचं काम अन् तिचा प्रवास प्रेरणादायी तेवढाच रंजक आहे.श्वेताच्या रक्तातच नाटक आहे. वडील आनंद, आई अलका पुराणिक दोघेही स्वत: नाट्यकर्मी. आजी बालकमंदिर चालवायची. त्यात ती बालकांसाठी नाटुकले बसवायची. मोठं कुटुंब असलेल्या या घरातील वातावरण नाटकासोबतच शैक्षणिकही. काका वगैरे अर्ध्याहून अधिक सदस्य हे लेक्चरर. नाटक आणि शैक्षणिक असे दोन्ही संस्कार श्वेतावर घडत गेले. वडील आनंद पुराणिक यांचा खामगावला प्रिंटिंग प्रेसचा व्यवसाय होता. सोबतच स्वत:ची नाट्यमाला ही नाट्यसंस्थाही होती. त्याअंतर्गत त्यांनी भरपूर नाटके केली. व्यवसाय प्रिंटिंगचा असला तरी त्यातून येणारी मिळकत नाटकांवर अधिक खर्च व्हायची. लग्नानंतर मात्र कुटुंबाच्या गरजा अधिक मोठ्या ठरू लागल्या. म्हणून आनंद यांनी नाटक सोडलं अन् ते नागपुरात स्थायिक झाले. श्वेतामध्ये हे गुण उतरले असले, तरी तिच्या बाबांनी नाटकाचा नही घरात येऊ दिला नव्हता. श्वेताची आवड ते ओळखून होते. मात्र, आधी तिनं दहावी-बारावी करावं, नंतर काय ती आवड जोपासावी, असं त्यांना वाटायचं. तरी नाटक मुळातून जाणार थोडीच? श्वेता ही काका, प्रिंटिंगच्या कामाने घरी येणारे गिऱ्हाईक यांच्या नकला करायची. उच्चाराच्या बाबतीत बाबा कडक होते. श्वेताकडून ते श्लोक पाठ करून घेत. वयाच्या आठव्या वर्षीच ती मंत्रपुष्पांजली अस्खलित म्हणायची. याचाच तिला पुढे चांगला फायदा झाला. शाळांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांत, नाटकांत ती पुढं असायची. असं करता करता ती नागपूरच्या नाट्यसृष्टीत वावरू लागली. एकदा प्रभाकर पणशीकरांचं तो मी नव्हेच हे नाटक आलं होतं. त्यात श्वेता यांच्या काकू मृणाल काम करीत होत्या. या नाटकातील एक कलावंत वेळेवर आजारी पडली. अशावेळी काकूंनी श्वेताचं नाव सुचवलं. त्या छोट्या भूमिकेसाठी श्वेता उभी झाली. साक्षात पणशीकरांसोबत काम करायला मिळणं, हे ती नशीब समजत होती. या नाटकाच्या तीन प्रयोगांत तिनं काम केलं. यादरम्यान विंगेत वावरून ती नाटकाचे तंत्र समजून घेऊ लागली. नंतर सायन्समध्ये पदवीचं शिक्षण सुरू झालं. यादरम्यान कथकमध्येही ती निष्णात झाली. ज्येष्ठ रंगकर्मी विनोद इंदूरकर यांनी तिला प्रोत्साहन दिलं. मग सुरू झाला राज्य नाट्यस्पर्धेचा प्रवास. स्टेजक्राफ्टमध्ये विकाश खुराणा यांच्यासोबत तिनं काम केलं. इंग्रजी, संस्कृत नाटकेही केली. राज्य नाट्यस्पर्धेत संहिता नवी असली की त्याचे वेगळे गुण असतात. म्हणून श्वेतानं माझिया मना हे पहिलं नाटक लिहिलं. या नाटकाला तब्बल २६ राज्य पुरस्कार मिळाले. तिथून मायानगरी मुंबई खुणावू लागली.२०१३ला श्वेता मुंबईत दाखल झाली. इकडे अपार संघर्ष अटळ होता. तोवर काय करायचं, म्हणून लेक्चररशिप सुरू केली. शिवाय, रसायनशास्त्रात पीएचडी सुरू होती. संघर्षादरम्यान जयोस्तुते, अस्सं सासर सुरेख बाई, कुंकू टिकली अन् टॅटू अशा मालिका मिळाल्या. अस्सं सासर...मुळे तर ती कमालीची लोकप्रिय झाली. याचदरम्यान नागपूरच्या पराग लुले यांनी श्वेतानं लिहिलेलं माझिया मना नाटक प्रख्यात दिग्दर्शक विजय केंकरे यांना वाचायला दिलं. ते वाचून केंकरे यांनी श्वेताला भेटायला बोलवलं. श्वेताला सुखद धक्काच बसला. केंकरेंनी तिचं कौतुक केलं, नाटकाची ऑफर दिली. मात्र, मालिका सुरू असल्यानं ते शक्य झालं नाही. त्याचदरम्यान चंद्रलेखा नाट्यसंस्थेला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी एक उपक्रम आखला. त्यासाठी श्वेताला गाठलं. तिनं आईचं पत्र हरवलं हे तिचं पहिलं व्यावसायिक नाटक लिहिलं.

या नाटकाचे काही मर्यादित प्रयोग झाले. मात्र, ते गाजले. तत्पूर्वी मुंबईत तो अलबेला हे पहिलं व्यावसायिक नाटक तिनं केलं. याच नाटकासाठी तिला रीमा लागू यांच्यासोबत नामांकन मिळालं होतं. नंतर ती नीरज शिरवईकर लिखित, विजय केंकरे दिग्दर्शित अ परफेक्ट मर्डरमध्ये सामील झाली. बदामराजा, बुक माय शो या बड्या कंपन्यांची निर्मिती असल्यानं या नाटकाचा आवाका आणि ग्लॅमर मोठं होतं. सतीश राजवाडे, पुष्कर श्रोत्री, प्रिया मराठे, सुबोध पांडे, श्रीकांत प्रभाकर, अनिकेत विश्वासराव अशी मोठी स्टारकास्ट सोबतीला होती. या नाटकानं तिला चांगली ओळख दिली. मग तिनं मागं वळून पाहिलंच नाही.

## आता नाटक करायचंय! शालिनी तुफान गाजल्यानंतर माधवी निमकरची इच्छा; म्हणाली- पुन्हा खलनायिकेची भूमिका...

**मुंबई:** पात्र खलनायकी असलं तरी, प्रेक्षकांच्या स्मरणात राहतं, हे त्या कलाकाराचं श्रेय असतं. असंच एक पात्र म्हणजे शालिनी आणि ते तितक्याच ताकदीनं प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणारी अभिनेत्री म्हणजे माधवी निमकर. सुख म्हणजे नक्की काय असतं! ही मालिका संपून काही महिने झाले आहेत. आता नाटक करण्याची इच्छा असल्याचं तिनं मुंटाला सांगितलं. नाटक केल्यामुळे माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळेच मी आजवर पुढचा अभिनयप्रवास करू शकले. आता मला विविध विषयांच्या कलाकृतींमध्ये काम कायचंय. पण त्यातही नाटक करण्याची तीव्र इच्छा आहे. रंगभूमी म्हणजे कलाकारांसाठी शाळा असते. कलाकारानं नाटकातली सहजता अनुभवली नसेल, तर कलाकार म्हणून काहीतरी सुटल्यासारखं वाटतं. रंगमंच तुम्हाला एका अवकाशातून सरळ जमिनीवर प्रेक्षकांसमोर आणून उभा करतो. तिथे तुम्ही प्रेक्षकांसमोर स्वत:ला जिंकून घेण्यासाठी येत असता. म्हणून नाटक महत्वाचं आहेमालिका या माध्यमातून तुम्ही रोज प्रेक्षकांसमोर येता. अशा वेळी आपली भूमिका कोणतीही असली, तरी आपलं काम चोख असावं. नकारात्मक भूमिका करत असताना त्या भूमिकेशी एकरूप व्हावं लागतं. खलनायकी भूमिका असली, तरी प्रेक्षकांना आपलं काम आवडतंय, ही बाब समाधान देणारी आहे.



यापुढेही पुन्हा एकदा नकारात्मक भूमिकेसाठी विचारणा झाली तर, त्यात वेगळं काय आहे, हे बघून मी ती स्वीकारेन, खलनायिका म्हणून मला एक ओळख मिळाली आहे. ती ओळख मला काम देत असेल, ऊर्जा देत असेल, तर ते मला महत्त्वाचं वाटतंमी आठवड्यातून पाच दिवस योग करते आणि दोन दिवस जिम. खाण्याच्या बाबतीत फार बंधनं नसतात. घरचं जेवण, समतोल आहाराचं सेवन आवश्यक आहे. मालिका आणि कुटुंब यांचा समतोल साधणं महत्त्वाचं आहे. कितीही काम असलं तरी दिवसाचा शेवट घरच्यांसोबतच व्हायला हवा. त्यांच्यासोबतचे छोटे-छोटे क्षणच आयुष्याचा खरा आनंद देतात. यामुळे तुमचं मानसिक स्वास्थ्यही उत्तम राहतं.

# आई-वडील विभक्त, चारही बहिणींना नातेवाईकांकडे सांभाळायला दिलं; नराधाम दाम्पत्याकडून संतापजनक कृत्य



**अहिल्यानगर (राहुरी) :** राहुरी () पोलिसांनी ऑपरेशन मुस्कान अंतर्गत मोठी कारवाई करत चार अल्पवयीन मुलींना लैंगिक अत्याचाराच्या नरकयातनेतून मुक्त केलं आहे. मागील तीन-चार वर्षांपासून दवणगाव (ता. राहुरी) येथील बजरंग कारभारी साळुंखे (वय ३९) आणि त्याची पत्नी शितल बजरंग साळुंखे (वय ४०) या दाम्पत्यानं या मुलींवर अमानुष अत्याचार केल्याचं उघडकीस आलं आहं. अहिल्यानगर येथील स्नेहालय संस्थेच्या स्वयंसेवक पूजा दहातोंडे यांनी दिलेल्या माहितीनंतर १७ सप्टेंबर रोजी रात्री राहुरी पोलिसांनी ही कारवाई केली. पीडित मुलींचे आई-वडील विभक्त झाल्यानं त्या मुलींना दूरच्या नातेवाईकांकडे सांभाळासाठी देण्यात आल्या होत्या. मात्र, त्यांचा गैरफायदा घेत लैंगिक शोषण सुरू असल्याचं तपासात उघड झालं. पीडित मुलींमधील एक सज्ञान झाल्यानंतर तिने ही बाब स्नेहालयाला सांगितली. त्यानंतर पोलिसांना तात्काळ माहिती देताच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने धाड टाकली. रात्री साडेबारा वाजता सर्व चार मुलींना वाचवण्यात आलं. मुलींचं समुपदेशन करून त्यांना स्नेहालय संस्थेत दाखल करण्यात आलं आहे. आरोपी दाम्पत्याविरोधात भादंवि कलम ३७६, ३७६(२) () आणि पोस्को कलम ४, ८, १२ अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक राजू जाधव व पोलिस कॉन्स्टेबल गणेश लिपणे करत आहेत. दरम्यान, ऑपरेशन मुस्कानअंतर्गत गेल्या वर्षभरात एकूण ८६ अपहरण व लैंगिक अत्याचारग्रस्त मुला/मुलींची सुटका करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलींचे आई-वडील हे एकमेकांपासून वेगळे झाले होते. यामुळे या चारंही मुली निराधार झाल्या होत्या. यामुळे या मुलींचा सांभाळ त्यांचे दूरचे नातेवाईक करत होते, अशी माहिती समोर आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, सांभाळ करणाऱ्यानेच त्या चारही मुलींवर लैंगिक अत्याचार केले. या प्रकरणी आता राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपीसह त्याच्या पत्नीलाही अटक केली आहे. या प्रकरणात आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

# विधानपरिषदेसाठी दादांचा उमेदवार ठरला, एकाच घरात दोन आमदार, आमदाराच्या नवऱ्यालाच तिकीट...



**मुंबई:** विधान परिषदेच्या पाच रिक्त जागांसाठी २७ मार्चला निवडणूक पार पडणार आहे. त्यापैकी तीन जागा भाजपच्या वाट्याला आल्या आहेत, तर प्रत्येकी एक जागा ही शिवसेना आणि अजित पवार गटाला मिळाली आहे. त्यासाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून उमेदवाराचं नाव जाहीर करण्यात आलं आहे. राष्ट्रवादीकडून संजय खोडके ( ) यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे आता एकाच घरात पती-पत्नी आमदार पाहायला मिळणार आहेत. पाच विधान परिषदेच्या ( २०२५) जागांसाठी भाजपकडून तीन नावांची घोषणा करण्यात आली आहे. भाजपकडून संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केणेकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर, शिवसेना शिंदे गटाकडून माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यानंतर आता राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून संजय खोडके यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली आहे.अजित पवार गटाकडून झिशान सिद्दीकी यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरु होती. त्यांना उमेदवारी मिळणार असं बोललं जात होतं. मात्र, त्यांच्या नावाला पक्षांतर्गत प्रचंड विरोध होता. त्यानंतर काही अजून नावही चर्चेत होती. मात्र, आता एक वेगळंच नाव समोर आलं आहे. संजय खोडके यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. विधान परिषदेच्या पाच जागा रिक्त असल्याने त्यासाठी २७ मार्चला निवडणूक होणार आहे. त्यासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अखेरची तारीख आहे. विधानसभेवर निवडून गेलेल्या पाच विधान परिषद सदस्यांच्या राजीनाम्यामुळे या जागा रिक्त झाल्याने त्या जागांवर ही निवडणूक होत आहे. त्यामध्ये भाजपच्या वाट्याला तीन तर राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेना एकनाथ शिंदे गटाकडे प्रत्येकी एक जागा आली आहे. या पाचही जागांसाठी आता उमेदवारांच्या नावांचीघोषणा झाली आहे

# आर एस एस कडून मोदींच्या राजीनाम्याचे संकेत, फडणवीसांना पंतप्रधानपदाची स्वप्ने; काँग्रेस नेत्याचा खोचक टोला



**पुणे:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७५ वर्षे पूर्ण केल्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मोदी यांचा राजीनामा घेण्याचे संकेत दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूरचे रहिवासी आहेत. त्यामुळे रेशीमबागेचे वारे हे त्यांच्या कानावर लवकर येतात. मोदी यांचा राजीनामा घेतला जाणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. मोदींनंतर आपणच पंतप्रधान होणार असेही स्वप्न फडणवीस यांना पडत आहे,फ असा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने काँग्रेसचे सपकाळ यांच्या वार्तालापाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले उपस्थित होते. वार्तालापात सपकाळ यांनी राजकीय भाष्य करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भारतीय जनता पक्ष, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर तोफ डागली. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या मतचोरीच्या मुद्द्याला उत्तर देण्यासाठी निवडणूक आयोगाने बोलण्याऐवजी भाजपचे नेते का पुढे येतात, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.गेल्या काही वर्षांमध्ये लोकसभा, विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस ला मिळालेल्या अपयशामुळे काँग्रेस पक्ष खिळखिळा झाला का, याबाबत प्रश्न विचारण्यात आला असता ङ्गकाँग्रेस पूर्वीपासूनच ङ्गमास बेसफ पक्ष होता. त्यामुळेच जे आले ते सत्तेच्या गादीवर बसले. मात्र, आता आम्ही काँग्रेसला ङ्गकेडर बेसफ पक्ष करण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्याशिवाय ङ्गभारत जोडोफच्या धर्तीवर आता ङ्गपक्ष जोडोफ मोहीम हातात घेणार आहोत,फ असे सूतोवाचही त्यांनी केले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपला वैचारिक पातळीवर कायमच विरोध करणारा काँग्रेस हा एकमेव देशव्यापी राजकीय पक्ष असल्याचे सपकाळ यांनी स्पष्ट केले



# मृताच्या एका दानातून मिळू शकते नऊ गरजूंना नवजीवन




दानाचे महत्त्व फार मोठे आहे. अन्नदान, वस्त्रदान वगैरे त्याचे प्रकार आहेत. बदलत्या काळात अवयवदानसुद्धा त्यात आले असून, त्याचे प्रमाण वाढण्याची गरज मात्र आहे. एखाद्या गरजू व्यक्तीला हवे ते देण्याचे समाधान फार मोठे असल्याची जाणीव सर्वांना असते. पण, सध्या देशात लाखो लोक अवयवदात्यांच्या प्रतीक्षेत आहेत. कोणाला हृदय, कोणाला यकृत, कोणाला मूत्रपिंड, तर कोणाला डोळ्यांची गरज आहे. एका मृत व्यक्तीच्या अवयवदानातून किमान नऊ जणांना नवजीवन मिळते हे लक्षात घेतले, तर अवयवदान किती मोलाचे आहे हे लक्षात येईल. संकेतस्थळावरील माहितीनुसार, सध्या देशभरात सुमारे १,०६,००० लोक अवयवदात्यांच्या प्रतीक्षेत असल्याचे दिसते.

अवयव मिळण्याच्या प्रतीक्षेत देशात दरवर्षी सुमारे पाच लाख लोक मरण पावतात. भारतात रस्ते अपघातांत दरवर्षी सुमारे दीड लाख लोक प्राण गमावतात आणि अशा घटनांत सर्वांत आधी मेंदूचे काम थांबते. अशा लोकांचे अवयव दान करता येत असले, तरी जेमतेम दोन ते तीन टक्के भाग्यवंतांनाच ते मिळतात.हे अवयव करता येतात दान...मृत व्यक्तीचे हृदय, फुफ्फुसे, यकृत, मूत्रपिंड, आतडी आणि स्वादुपिंड हे अवयव दान करता येतात. डोळ्यांच्या बाहुलीचा पारदर्शक पडदा हाडांतील नसा, मांसपेशी, स्नायूबंध, अस्थिबंधन, कूर्चा आणि हृदयाच्या झडपाही गरजू रुग्णाला उपयोगी पडतात. जिवंत व्यक्तीचे एक मूत्रपिंड आणि यकृताच्या काही भागाचेही दान करता येते. एका मूत्रपिंडावर दात्याला जगता येते आणि यकृताची वाढ होऊन ते पुन्हा पहिल्या आकारात येते. त्यामुळ दात्याला काही त्रास होत नाही.

अवयवदानाची प्रक्रिया : जिवंत व्यक्ती मूत्रपिंड किंवा यकृत देणार असेल, तर तिची आधी वैद्यकीय तपासणी केली जाते. मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी हे अवयव प्रत्यारोपणासाठी योग्य असल्याचे सांगितल्यावरच पुढील प्रक्रिया सुरू होते. दात्याच्या शरीरातील हे अवयव शस्त्रक्रियेद्वारे काढून घेऊन त्यांचे प्रत्यारोपण करेपर्यंत ते रसायनांत सुरक्षित ठेवले जातात. अवयवदात्याला काही महिन्यांपर्यंत वैद्यकीय निरीक्षणाखाली ठेवले जाते. मृत व्यक्तीच्या मेंदूने काम करणे पूर्णपणे थांबविले असल्याची खात्री आधी करून घेतली जाते. याबाबतच्या अहवालात ब्रेन स्टेम डेडफ्वे सत्यापन केले असेल, तर मृताच्या नातलगांची परवानगी घेतली जाईल. तोपर्यंत मृताला व्हेंटिलेटवर ठेवतात. कोणत्या रुग्णाला कोणता अवयव हवा आहे याबाबत प्रतीक्षा यादी तपासली जाऊन रुग्णाला सूचना देऊन संबंधित रुग्णालयात आणले जाऊन अवयव प्रत्यारोपण केले जाते.नंतर मृताचे पार्थिव नातलगांकडे दिले जाते.

अंतिम अनुमती : ब्रेन डेडघोषित केल्यानंतर प्रत्यारोपण करण्याबाबतचा निर्णय पूर्णपणे मृताचे निकटवर्तीय आणि नातलगांचा असतो.संबंधित व्यक्तीने जिवंत असताना आपल्या मृत्यूनंतर आपले अवयवदान करावे, असे जाहीर केले असले, तरी नातलगांनी अनुमती देईपर्यंत अवयवदान करता येत नाही. मेडिको लीगलप्रकरणांत अवयवदानापूर्वी पोलिसांच्या एनओसीफ्ची गरज असते. अवयवदानापूर्वी मृत्यूनंतरच्या औपचारिकता पूर्ण करण्यासाठी शरीर फॉरेन्सिक तज्ज्ञांकडे पाठविले जात्,न डेडतरतूद : माणसाच्या मेंदूने प्रतिक्रिया देणे बंद करणे, मेंदूद्वारे संचलित होणाऱ्या सर्व क्रिया बंद होणे ही ब्रेन डेडची स्थिती असते. पण, व्हेंटिलेटरच्या माध्यमातून शरीरातील काही अवयव काही काळ जिवंत ठेवता येतात. पण, या स्थितीत पुन्हा जीवन मिळणे फार कठीण असते.

त्यामुळे अवयव दानाच्या हेतूसाठी १९९४ मध्ये तयार करण्यात आलेल्या मानव अंग आणि ऊतक प्रत्यारोपण अधिनियमांतर्गत अवयवदान करणाऱ्या व्यक्तीचे ब्रेन डेडप्रमाणपत्र अनिवार्य असते. घरात किंवा अन्यत्र हृदयविकाराच्या झटयामुळे मरण पावलेली व्यक्ती अवयवदान करू शकत नाही. कारण, हृदयाचे काम थांबविल्यावर काही मिनिटांतच मृताच्या शरीरातील सर्व अवयव काम करणे बंद करतात आणि असे शरीर अवयवदानासाठी उपयोगी पडत नाही.रुग्णालयात मृत्यू झालेल्या आणि डॉटरांनी ब्रेन डेडप्रमाणित केले असेल, तर अशा व्यक्तीचे अवयव कृत्रिम माध्यमातून सक्रिय ठेवून त्यांचा उपयोग प्रत्यारोपणासाठी वापर करता येतो. कृत्रिमरीत्या सक्रिय ठेवलेले अवयव विशिष्ट कालावधीत वापरावे लागतात. त्यात मृत व्यक्तीचे हृदय आणि फुफ्फुसे चार ते सहा तासांच्या आत, यकृत सहा ते बारा तासांत, मूत्रपिंड ३० तासांत आणि स्वादुपिंड सहा तासांच्या आत वापरावे लागते.

अवयवदानाबद्दल मृताच्या नातलगांना काहीही पैसे दिले जात नाहीत, तसेच रुग्णाकडूनही काही पैसे घेतले जात नाहीत. अवयवदान करणे, अवयव काढून घेऊन पुन्हा शस्त्रक्रिया करण्याचा खर्च रुग्णालयेच करतात.

# बसल्याजागी व्यायाम करून घ्या

बहुतेकजण व्यायाम करण्याचे ठरवतात; पण आळसापोटी रोज टाळत असतात. पण, आता असे करण्याचे कारण नाही. काही व्यायाम बसून सहजतेने करता येऊ शकतात.हे सोपेही आहेत व परिणामकारकही.

खांदे व मानदुखीपासून आराम : खुर्ची वा स्टुलावर आरामात बसा. दोन्ही तळहात खांद्यांवर ठेवा. या स्थितीत डावीकडे व उजवीकडे वळा.आता १ मिनीट सतत अशाप्रकारे डावीउजवीकडे वळत राहावे. नियमितपणे हा व्यायाम केल्यास खांदे व मानदुखीपासून आराम मिळतो. तसेच, ब्राउन फॅटसेल्सही सक्रिय होतात व कंबरेजवळील चरबीही कमी होते.

पोश्चर नेटका राहील : सरळ बसून पोटाखाली दोन्ही तळहात ठेवा. या स्थितीत राहात कंबरेतून प्रथम उजवीकडे व नंतर डावीकडे वळा. हा सतत १ मिनीट करीत राहा. नियमितपणे केल्यास कण्याच्या खालच्या भागात लवचिकपणा येतो व पोश्चरही नेटका राहतो.

कंबर राहील सुडौल : स्टूल वा बिनहाताच्या खुर्चीत बसावे. सरळ बसून कंबरेवर दोन्ही हात ठेवावेत. आता या स्थितीत राहत डावी-उजवीकडे वळायचे आहे. हे सतत १ मिनीट करा. नियमितपणे केल्यास कंबरेच्या आजूबाजूचे स्नायू, तर मजबूत होतीलच. शिवाय पोट व कंबरेची जादा चरबीही कमी होईल.लक्षात ठेवा की, हा करताना पाठीचा कणा एकदम ताठ ठेवायचा आहे. वाकून बसायचे नाही.

पोटाची चरबी कमी होईल : सरळ बसत आपल्या दोन्ही हातांची बोटे एकमेकांत अडकवा. आता कंबरेतून प्रथम उजवीकडे व नंतर डावीकडे वळा. वळताना हातही वळवायचे आहेत. व्यायाम सतत १ मिनीट करावा.नियमितपणे हा केल्यास पोटाजवळ साचलेली चरबी नष्ट होत असते. लक्षात ठेवा की झटयात न वळता सावकाश आरामात वळायचे आहे.

स्नायूंना मिळेल बळकटी : सरळ बसावे व दोन्ही तळहात डोयावर ठेवावेत. याच स्थितीत राहात कंबरेतून उजवीकडे व नंतर डावीकडे वळा.असे सतत ५० ते ६० सेकंद करा, या व्यायामाने बगलेतील स्नायू मजबूत होतात व खांद्याजवळील जादा चरबीही कमी होते. या व्यायाम रोज १ ते २ मिनिटे करावा.




# मुळ्याची पानं गुणकारी

**मुळ्याच्या पानांमध्ये लोह खूप अधिक प्रमाणात असते.म्हणून त्यांचं सेवन खूप अधिक प्रमाणात करा. यामुळे शरीराची त्वचा मुलायम होते. मुळ्याच्या पानांचा रस पचनक्रियेमध्ये वृद्धी करतो. मुळ्याच्या मऊ पानांवर सैंधव मीठ लावून खाण्याने मुखदुर्गंधी दूर होते.**

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# युजवेंद्र चहल डेटिंग करत असलेल्या आरजे महावशची संपत्ती आहे किती..



**नवी दिल्ली :** चॅम्पियन्स ट्रॉफीची फायनल सुरु असताना अचानक कॅमेरा गेला तो प्रेक्षकांमध्ये आणि त्यावेळी सर्वांनाच मोठा धक्का बसला. कारण प्रेक्षकांमध्ये यावेळी युजवेंद्र चहल बसला होता आणि त्याच्याबरोबर एक सुंदरी होती. ही सुंदरी आरजे महावश असल्याचे त्यानंर समोर आले. चहल हा महावशला डेट करत असल्याची चर्चा त्यानंतर सुरु झाली. पण ही आरजे महावश करते तरी काय, महिन्याला किती पैसे कमावते, कुठून कमावते आणि आतापर्यंत तिची संपत्ती आहे तरी किती, ही माहिती आता समोर आली आहे. चहल आणि धनश्री वर्मा यांच्या घटस्फोटाची जोरदार चर्चा सुरु होती. पण चहल मात्र एका सुंदरीबरोबर एका हॉटेलमध्ये असल्याचे समोर येत होता. ख्रिसमसचा सण साजरा होत असताना चहल हा एका सुंदरीला डेट करत असल्याचे म्हटले जात होते. त्यावेळी या अफवा असल्याचे म्हटले गेले. पण चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये खरं ते समोर आलं.चॅम्पियन्स ट्रॉफीची फायनल सुरु असताना युजवेंद्र चहल हा त्याच सुंदरीबरोबर होता. या सुंदरीचे नाव आरजे महावश असल्याचे नंतर समोर आले. त्यामुळे चहल हा आरजे महावशला डेट करत असल्याच्या चर्चांना यावेळी चांगलेच बळ मिळाले.आरजे महावश ही सोशल मीडियावर जास्त प्रसिद्ध आहे. रेडिओ मिर्ची ९८.३ या चॅनेलवरुन तिने करीअरला सुरुवात केली होती. त्यानंतर आता ती प्रँक व्हिडिओसाठी ओळखली जाते. ती भारताची पहिली महिला प्रँक स्टार आहे, प्रँकचे व्हिडिओ करत ती करोडो लोकांपर्यंत पोहोचली आहे. तिने अलीगढ येथील मुस्लीम विद्यापीठामधूव पदवी घेतली आणि त्यावंतर दिल्ली येथीन मास कम्युनिकेशनचा कोर्स केला. तिचे फक्त इंस्टाग्रामवर १.५ मिनियन फॉलोअर्स आहेत, तर आतापर्यंत आठ लाखपेक्षा जास्त लोकांनी तिचे यु ट्यूब चॅनेल सबसक्राइब केले आहे. तिला बिग बॉसच्या १४ व्या हंगामाचीही ऑफर आली होती, पण तिने खासगी कारणांमुळे ही ऑफर नाकारली.आरजे महावश ही फक्त आता प्रँक व्हिडिओ करत असते. त्यामुळे महिन्याला ७० ते ८० हजार रुपये ती सहजपणे कमावते. तिची नेटवर्थ ही आजच्या घडीला जवळपास ३५ लाख रुपये असल्याचे म्हटले जात आहे. जर आरजे महावश आणि धनश्री वर्मा यांच्या नेटवर्थची तुलना केली तर धनश्रीकडे जास्त नेटवर्थ आहे. कारण धनश्री वर्माचे नेटवर्थ जवळपास २४ कोटी रुपये आहे, त्यापुढे आरजे महावशचे नेटवर्थ काहीच नसल्यचो समोर येत आहे.चहल आणि आरजे महावश यांचे फोटो चांगलेच व्हायरल झाले होते. त्यामुळे त्यांच्या डेटिंगची चर्चा रंगत होती. त्यावेळी आरजे महावशने आमच्यामध्ये असे कोणतेच नाते नसल्याचे सांगितले होते. पण आता हे दोघे चॅम्पियन्स ट्रॉफीची फायनल पाहण्यासाठी एकत्रच बसल्याचे पाहायला मिळाले होते.युजवेंद्र चहल आणि आरजे महावश यांना एकत्र पाहिल्यावर आता चाहत्यांनी त्याचं अफेअर सुरु असल्याची चर्चा सुरु केली आहे. पण या दोघांनी याबाबत कोणतेही भाष्य केलेले नाही.


## करिना कपूरला करायचा नव्हता जब वी मेट, या व्यक्तीनं समजावलं अन् सिनेमासाठी तयार झाली बेबो...



**मुंबई:** बॉलिवूडमधलं एक्स कपल करिना कपूर आणि शाहिद कपूर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. ब्रेकअपनंतर पहिल्यांदाच ते कॅमेरासमोर बोलताना दिसले. असं नाही की ते एकत्र आले नव्हते, पण त्यांनी एकमेकांशी बोलणं आतापर्यंत टाळलं होतं.पण नुकत्याच एका कार्यक्रमात ते एकमेकांसोबत गप्पा मारताना दिसले. त्यामुळं जब वी मेट २ची चर्चा सुरू आहे.. जब वी ब वी मेट या चित्रपटानंतर अभिनेता शाहिद कपूर आणि करीना कपूर यांचं ब्रेकअप हा दीर्घकाळ चर्चेचा विषय होता. त्यानंतर दोघं त्यांच्या-त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यात रमले होते. उडता पंजाब या चित्रपटात हे दोघं होते; ते फक्त सहकलाकार म्हणून ! त्यांनंतर चाहत्यांनी त्यांनी एकत्र काम करण्याची आशाही सोडून दिली होती. आता मात्र ही चर्चा पुन्हा रंगू लागली आहे, त्याला कारण ठरलाय एक पुरस्कार सोहळा आणि त्यातली या दोघांची भेट.या पुरस्कार सोहळ्यात शाहिद-करिना भेटले, व्यासपीठावर दोघांनी एकमेकांना मिठी मारली आणि त्यांच्या गप्पाही रंगल्या. त्यानंतर माध्यमांशी बोलताना शाहिदनं त्यावर भाष्यही केलं. दिग्दर्शक एखादी चांगली कथा घेऊन आला, तर काही हरकत नाही.

मात्र हा प्रश्न दिग्दर्शकाला विचारायला हवा, असं शाहिदचं म्हणणं होतं. शाहिद आणि करिना एकत्र काम करतील की नाही, हे माहीत नाही. मात्र या सोहळ्यात दोघांचाही वावर पुन्हा मैत्री झाल्यासारखा असल्यानं आता चाहत्यांना जब वी मेट २चे वेध लागले आहेत. पण तुम्हाला एक गोष्ट माहिती आहे की, जब वी मेट सिनेमासाठी करिनानं नकार दिला होता. जेव्हा निर्मात्यांनी करिनाला जब वी मेट सिनेमासाठी विचारलं तेव्हा तिनं थेट नाही असं सांगितलं होतं. तिला स्क्रिनवर हटके अशी भूमिका करायची होती. यासाठी तिनं दीड वर्षे ब्रेक घेतला होता. दिग्दर्शक इम्तियाज अलीचा हा दुसराच सिनेमा होता, त्यामुळं तिला शंका होती. पण शाहिदनं तिला नंतर समजावलं आणि ती या सिनेमासाठी तयार झाली. पण सिनेमाची शूटिंग संपता संपता दोघांच्या नात्यात दुरावा आला होता.

## अक्षय-प्रियंकाच्या ७ मिनिटांच्या होळीच्या गाण्याला शूट करण्यासाठी लागले होते सात दिवस; नेमकं काय घडलेलं सेटवर...



**मुंबई -** होळीची गाणी ऐकल्याशिवाय होळीची मजा पूर्ण होत नाही. पण होळीचं गाणं शूट करणं इतकं सोपं नाही. असंच एक होळीचं गाणं फक्त सात मिनिटांचं आहे, परंतु ते शूट करण्यासाठी सात दिवस लागले. २००५ मध्ये अमिताभ बच्चन यांचा वक्त: द रेस अगेन्स्ट टाइम हा चित्रपट प्रदर्शित झाला, ज्यामध्ये अक्षय कुमार आणि प्रियांका चोप्रा मुख्य भूमिकेत होते. या गाण्यातली अक्षय आणि प्रियांकाची केमिस्ट्री फारच गाजली होती. होळीचं हे गाणं अनुमोल आणि सुनिधी चौहान यांनी गायलं आहे. हे सात मिनिटांचं होळीचं गाणं शूट करण्यासाठी सात दिवस लागले. या गाण्याचं नाव डू मी अ फेवर लेट्स प्ले होली असं या गाण्याचं नाव आहे. आयएमडीबीच्या मते, गाण्याचं शूटिंग अनेक कारणांमुळे उशिरा झालं. ज्यामध्ये चित्रपटाची अभिनेत्री प्रियांका चोप्रासोबत सेटवर एक अपघात झाला. होळी गाण्याच्या शूटिंगदरम्यान, सेटवर सर्वत्र पाणीच पाणी होतं. प्रियांका चोप्रा तिच्या व्हॅनिटीमधून बाहेर येत असताना, तिने एका विजेच्या तारेवर पाऊल ठेवलं, ज्यामुळे तिला विजेचा धक्का बसला. सुदैवाने, युनिट सदस्यांच्या सतर्कतेमुळे ती वाचली आणि रुग्णालयात एक रात्र घालवल्यानंतर तिला डिस्चार्ज देण्यात आला. जेव्हा डू मी अ फेवर लेट्स प्ले होली या चित्रपटातील होळीचं गाणे प्रदर्शित झालं तेव्हा ते सर्वोत्तम होळी गाण्यांच्या यादीत समाविष्ट झाले.अक्षय कुमार आणि प्रियांका चोप्राचा एकत्रित शेवटचा चित्रपट होता. हा चित्रपट विपुल अमृतलाल शाह यांनी दिग्दर्शित केला होता. या सिनेमात अक्षय, प्रियांका आणि अमिताभ यांच्याव्यतिरिक्त बोमन इराणी, आसावरी जोशी, हेमंत पांडे, राजपाल यादव यांनीही भूमिका साकारल्या आहेत.

# पंखिडा ओ पंखिडा! हॅलो बुलढाणा प्रस्तूत गरबा मोहत्सवाचे थाटात उद्घाटन!

## तरुणींच्या प्रचंड प्रतिसादात आदिशक्तीचा जागर!

## स्त्रीशक्तीचे व एकात्मतेचे दर्शन!

**जनसंचलन/बुलढाणा**

सोमवार पासून नवरात्र उत्सवाला सुरुवात झालीय... विविध ठिकाणी हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातोय. नऊ दिवस देवीची आराधना, जागरण, गरबा आणि दांडिया अशा अनेक कार्यक्रमांतून भक्तांचा उत्साह दिसून येतो. बुलढाणा शहरातही विष्णूवाडी येथील राजे लॉन येथे हॅलो बुलढाणा व कायस्थ केटर्स अँड इव्हेंट मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गरबा फेस्टिवलचे उद्घाटन मोठ्या थाटात झाले आहे.भाजपचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे त्यांच्या पत्नी अर्पिता ताई शिंदे, चंद्रकांत बर्दे, शहराध्यक्ष मंदार बाहेकर आणि कोरिओग्राफर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा उत्साहात संपन्न झालाय. विशेष म्हणजे या गरबा उत्सवाला प्रचंड प्रतिसाद मिळत असून, स्त्रीशक्तीचे व एकात्मतेचे दर्शन घडत आहे. नवरात्री उत्सवात आता गरबा नृत्याला अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. नऊ दिवस दुर्गा मातेच्या नऊ रुपांची विधीवत पूजा केली जाते. तसेच नवरात्रीच्या काळात गरबा आणि दांडिया नृत्य प्रकाराची परंपरादेखील साजरी केली जाते.हॅलो बुलढाणा व कायस्थ केटर्स अँड इव्हेंट मॅनेजमेंट यांच्या संयुक्त यांच्या पुढाकारात दरवर्षी तरुणींचा व महिलांचा गरबा दुर्गोत्सवात रंगत आणतोय. काल सोमवारी या गरबा महोत्सवाचा उद्घाटन सोहळा जल्ल-ोषात व भक्तीमय वातावरणात पार पडला.प्रारंभी हॅलो बुलढाणा, दैनिक जनसंचलन,सिटी न्यूज वृत्तवाहिनीचे संपादक जितेंद्र कायस्थ, ओम कायस्थ यांच्यासह मान्यवरांनी दीप प्रज्वलन केले. त्यानंतर आई जगदंबाची आरती करण्यात आली. याप्रसंगी आदिशक्तीचा उत्सव अधिक आनंददायी करण्यासाठी गरबा खेळण्यात आला.स्त्री रूपाचा सन्मान, पूजा आणि उत्सव असलेल्या या गरबा महोत्सवात लहान मुली, तरुणी आणि महिला गाण्यांच्या बोलावर थिरकल्या.. त्यामुळे या गरबा उत्सवाची धूम बुलढाणेकरांना अनुभवता आली.



आता नऊ दिवस हा गरबा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून आदिशक्तीचा जागर करण्यात येणार असल्याने नऊ दिवसही गरबा उत्सव रंगतदार होत जाणार आहे.

# क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या च्या लढ्याला यश शासकीय ज्वारी खरेदीस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**जनसंचलन/ बुलढाणा**



शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने लढा उभा करणाऱ्या क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या आंदोलनाला यश आले आहे. राज्य सरकारने शासकीय ज्वारी खरेदीला ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिल्याचे १८ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे स्पष्ट झाले आहे. ३० ऑगस्ट रोजी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकऱ्यांनी मलकापूर येथील उपविभागीय कार्यालयावर भव्य मोर्चा काढला होता. या मोर्च्यात ज्वारी खरेदी केंद्र तात्काळ सुरू करावे व मुदतवाढ द्यावी, यासह विविध मागण्या मांडण्यात आल्या होत्या. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव, खामगाव, संग्रामपूर, जळगाव जामोद व मलकापूर या भागात यंदा ज्वारीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे. शेतकऱ्यांनी हमीभावासाठी नोंदणी केली असली तरी खरेदी केंद्र बंद असल्याने त्यांना ज्वारी कमी दराने खुल्या बाजारात विकावी लागत होती. त्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडले होते. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे व मोर्चामुळेच प्रशासन व सरकारवर दबाव निर्माण झाला आणि अखेर शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. या मुदतवाढीबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना शेतकरी नेते रविकांत तुपकर म्हणाले, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा देणे हेच आमचे ध्येय आहे. शासकीय ज्वारी खरेदी केंद्र सुरू ठेवण्यासाठी आम्ही संघर्ष केला आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. पुढेही शेतकऱ्यांसाठी लढत राहू.ङ्घङ्घ शासकीय ज्वारी खरेदीस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ संघटनेच्या वतीने दिलेल्या लढ्यामुळे मिळाल्याचा दावा क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे.

# साग वृक्षांची अवैध कत्तल पाच आरोपींना अटक



**जनसंचलन/ जळगाव जामोद**

कुंवरदेव-२ राखीव वनक्षेत्रात साग वृक्षांची अवैध कत्तल केल्याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली असून, नष्ट झालेल्या वनसंपत्तीची किंमत अडीच लाख रुपये इतकी असल्याचे वन विभागाच्या पाहणीत निष्पन्न झाले आहे. न्यायालयाने सर्व आरोपींना २५ सप्टेंबरपर्यंत वनकोठडी सुनावली आहे. वन विभागाला मिळालेल्या माहितीच्या आधारे, १५ सप्टेंबर रोजी अधिकारी व कर्मचारी संबंधित भागात गेले असता, साग वृक्षांची तोड सुरू असल्याचा आवाज ऐकू आला. त्या दिशेने गेल्यावर आरोपींनी टेकडीवरून दगडफेक केली. घनदाट जंगल आणि सायंकाळची वेळ असल्याने आरोपींना पळ काढला. घटनास्थळी पाहणी केली असता एक मोबाइल फोन व कुन्हाड आढळली. यावरून गुन्हा दाखल करण्यात आला. दि. १६ सप्टेंबर रोजी स्थळाची पुन्हा पाहणी करताना ३१ साग वृक्षांची अवैध कत्तल केल्याचे समोर आले. या तोडीमुळे अंदाजे अडीच लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले. तपास सुरू असताना २० सप्टेंबर रोजी राजाराम नमला किराड्या व गटुसिंग गेंदालाल अलावा (दोघे रा. कुंवरदेव) या आरोपींना अटक करून भारतीय वन अधिनियम १९२७केला. अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे

# बुलढाण्यात बुधवारी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा...

**जनसंचलन/ बुलडाणा**

जिल्हातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर बुलडाणा आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बुलढाणा संयुक्त विद्यमाने पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन बुधवार दि. २४ सप्टेंबर रोजी येथील शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे करण्यात आले आहे सदर रोजगार मेळाव्यामध्ये बजाज ऑटो प्रा.लि. छत्रपती संभाजी नगर या उद्योजकांनी त्यांच्याकडील इलेक्टीशियन, वेल्डर, डिझेल मॅकनिक, फिटर, मशीनिष्ठ रिक्त पदे अधिसुचित केलेली आहे. या कार्यालयाकडे नोंदणीकृत उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळावाद्वारे सदर




कंपनीच्या प्रतिनिधीद्वारे गरजू व रोजगार इच्छुक उमेदवाराच्या मुलाखती घेण्यात येवून त्यांची प्राथमिक निवड करण्यात येणार आहे. पात्र, गरजु व नौकरी इच्छुक उमेदवार आपल्या शैक्षणीक पात्रतेच्या आधारे मुलाखत देऊ शकतात. तरी दि. २४ सप्टेंबर रोजी शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुलढाणा येथे आवश्यक त्या कागदपत्रांसह सकाळी १० वाजता स्वखर्चाने उपस्थित राहुन नाव नोंदणी करुन कंपणीच्या प्रतिनीधी समवेत मुलाखत द्यावी. बुलढाणा जिल्ह्यातील जास्तीत जास्त उमेदवारानी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग.प्र. बिटोडे यांनी केले आहे याबाबत काही अडचण आल्यास जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बुलडाणा या कार्यालयाच्या (०७२६२-२४२३४२) या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# वसतिगृह प्रवेशापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांनी आधार, स्वयंम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणर**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शासकीय वसतीगृहापासून वंचित असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी २९ सप्टेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक मनोज मेरत यांनी केले आहे.

अर्जाची प्रक्रिया व निवड याद्या या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने पार पडणार असून शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपला अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण जिल्हा कार्यालय, बुलढाणा येथे सादर करावा.

पात्रता : इयत्ता १२ वी नंतर उच्च शिक्षणासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेले विद्यार्थी, शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळाल्याचे प्रमाणपत्र, इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व धनगर समाजातील विद्यार्थी पात्र, किमान ६० टक्के (दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के गुण), पालकांचे वार्षिक उत्पन्न २ लक्ष ५० हजारांपेक्षा जास्त नसावे, कमाल वय ३० वर्षांपर्यंतच पात्र, स्वयंघोषणा पत्र, विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा तसेच कोणत्याही नोकरी/व्यवसायात नसावा.

# खेलो इंडिया राज्य निपुणता केंद्रांतर्गत शूटिंग खेळाची निवड चाचणी; २५ सप्टेंबरला उपस्थित राहण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण करण्यासाठी केंद्र शासनाच्या भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या वतीने खेलो इंडिया राज्य निपुणता केंद्रांतर्गत शूटिंग खेळाची निवड चाचणी दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे. निवड चाचणीमध्ये खेळाची चाचणी समितीमार्फत घेऊन गुणानुक्रमे निश्चित केला जाणार आहे. त्याकरिता जिल्ह्यातील शुटिंग खेळाचे इच्छुक खेळाडूंनी जिल्हा क्रीडा कार्यालयात दि. २३ सप्टेंबरपर्यंत संदीप केळे (मो. नं. ९४२३४४६५१६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी केले आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | – |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४



पत्रकारीतेचा धर्म

आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल

वेब साईड & पोर्टल चॅनल

वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर

कुठली ही बातमी निशुल्क

***

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

काही तक्रार असल्यास संपर्क

शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040

पिन 443001